**Nibandha Mala**(*UGC CARE Journal*)

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

# लोकप्रशासन व महाराष्ट्र शासणाचे जलधोरण

**प्रा.डॉ.बालाजी कत्तूरवार**
लोकप्रशासन विभाग प्रमुख व संशोधन मार्गदर्शक
देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

**श्री.तिरकमटे निवृत्ती तुकाराम**
पी.एच.डी.संशोधन केंद्र
देगलूर महाविद्यालय देगलूर जि. नांदेड

**प्रस्तावना:—**

लोकप्रशासनाला २१ व्या शतकात एक अत्यंत महत्वाचे सामाजीक शास्त्र म्हणून ओळखले आहे. विकसित, विकसनशील व अविकसीत अशा सर्व प्रकारच्या राष्ट्रांमध्ये लोकप्रशासन अस्तित्वात असल्याचे दिसून येते. प्रत्येक देशातील शासण व्यवस्था ही त्यांच्या देशातील नागरीकांच्या कल्याणासाठी वेगवेगळे योजना व धोरण राबवते. आणि हे धोरण जयज्ञ यंत्रणेमार्फत राबवले जाते त्यालाच लोकप्रशासन असे म्हणतात.म्हणूनच लोकप्रशासनाचे अस्तित्व जगभरातील प्रत्येक देशात असल्याचे दिसून येते. कुठलेही शासन व्यवस्था ही आपली धेय – धोरणे लोकप्रशासनाशिवाय पूर्ण करु शकत नाही. त्यामुळे राज्याचे कार्यक्षेत्र वाढत असल्यामुळे लोकप्रशासनाचेही कार्यक्षेत्र दिवसेंनदिवस वाढत चालले आहे.

प्राचीन काळापासूनच प्रशासन व्यवस्था अस्तित्वात असल्याचे दिसून येते. प्राचीन इजिप्त संस्कृती, मेक्सीकोमधील माया संस्कृती, भारतातील सिंधू संस्कृती इत्यादी प्राचीन संस्कृतीमध्ये ही लोकप्रशासन अस्तित्वात असल्याचे दिसून येते. तत्कालीन प्रशासन व्यवस्थेचा प्रभाव त्यावेळेस त्या प्रशासन व्यवस्थेवर पडलेला दिसून येतो तसे प्राचीन भारताचा ईतिहास बघीतला असता रामायन,महाभारत,मनुसंमती मौर्य काळातील कौटील्य यांचे प्रशासन व अर्थ निती संबंधी त्यांनी लिहलेला अर्थशास्त्र हा ग्रंथ लोकप्रशासनातील सर्वात प्राचीन ग्रंथ मानला जातो. त्याच बरोबर ही पॉलिटिक्स हा ऑरीस्टॉटल यांचा ग्रंथ या सारख्या जगप्रसिध्द ग्रंथातही लोकप्रशासनाचे विचार दिसून येतात.

लोकप्रशासन या विषयाचा उदय अमेरिकेत ११व्या शतकात झाला. लोकप्रशासनाला मुर्त व शास्त्रीय स्वरुप मिळवून देण्याचे कार्य वूड्रो विल्सन यांनी १९८७ साली Political Science of History या मुखपत्रामध्ये The Study of Administration निबंध लिहला. आणि येथूनच लोकप्रशासनाच्या खऱ्या अभ्यासाला सुरुवात झाली. राज्यशासनापासून लोकप्रशासनाला वेगळया पध्दतीने अभ्यासले जाऊ लागले.

प्रत्येक देशाच्या शासण व्यवस्थेत दोन घटक महत्वाचे असतात. एक म्हणजे लोकप्रतिनिधी दुसरे प्रशासकीय यंत्रणा व त्यामध्ये काम करणारा सनदी कर्मचारी वर्ग या सनदी नोकर वर्गावरच सरकरणे यश अपयश अवलंबून असते. सनदी सेवक हा प्रशासकीय व्यवस्थेचा आत्मा मानला जातो. आधुनिक शासणाने लोक कल्याणकारी राज्य व लोकाभीमुख प्रशासन या संकल्पनेने स्वीकार केला आहे. त्यामुळेच प्रशासणच्या कार्यक्षेत्रात प्रचंड वाढ झालेली आहे. सनदी सेवकावरच शासणाच्या यश, अपयशाची भिस्त अवलंबून असते. शासणाने घेतलेले लोकउपयोगची धोरणांची व निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी

Copyright ©authors

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

प्रशासकीय यंत्रणेवरच आहे. परंतु हे सनदी नोकर जर कामचुकार व बेशिस्त वागत असतील तर शासणाच्या ध्येय धोरणांची व्यवस्थीत अंमलबजावणी होऊ शकणार नाही. म्हणूनच प्रामाणिक व चारित्र्यसंपन्न व कार्यक्षम अशा नोकर वर्गाची आवश्यकता आहे. तर शासणाचे धोरण योग्य पध्दतीने पूढे जाऊ शकते.

**महाराष्ट्र शासणाचे जल धोरण :–**

पाणी म्हणजे जीवन मानव इतर सजीव सृष्टीची महत्वाची गरज म्हणजे पाणी,पृथ्वी अस्तित्वात आल्यापासून पाणी वापर होत आलेला आहे. पाण्याच्या अस्तित्वातच अनेक मानव संस्कृती वाढवल्या व भरभराटीला आल्या. पृथ्वीचा ३/४ भाग हा पाण्याने व्यापला असला तरी त्यातील बहुतांश वनस्पती,प्राणी व मानव यांना गोडे पाणी लागते. शासनाच्या अनेक धोरणा पैकी शासणाचे जलधोरण हे महत्वाचे आहे. आज शासन स्तरावरुन अनेक उपयुक्त योजना केल्या जात असल्या तरी त्या अपुऱ्या पडताना दिसत आहेत. कारण महाराष्ट्रात वाढत्या लोकसंख्येबरोबरच पाण्याची मागणी मोठया प्रमाणात वाढली. शहरे वाढली, शेतीसाठी पाणी, पिण्यासाठी पाणी पूरवण्याची जबाबदारी शासनावर येऊन आज महाराष्ट्रातील चित्र पाहता गेल्या अनेक दशकापासून निसर्गाच्या बदललेल्या कालचक्रामुळे पाणी प्रश्न राज्य गंभीर बनला आहे. पाण्याचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला आहे. शासनाकडून गेलेले नियोजन व जलव्यवस्थापन अपूरे पडत आहे.व लोकांची पाण्यासाठी ओरड कायम आहे. याचाच व प्रशासकीय यंत्रणा हया अंमलबजावणी यंत्रणा आहेत त्यामुळे शासनाने ठरवलेले जलधोरण प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पूर्नत्वास जाताना दिसत नाही. नेमके या शासणाने जलधोरणचा अभ्यास व सनदी नोकर वर्गाची अकार्यशीलता आणखी काय याचा अभ्यास या शोधनिंबधातून करण्यात येणार आहे.

**उद्देश :–**

१. लेकप्रशासन विषयाची अंमलबजावणीतील भुमिका जाणून घेणे.
२. म्हाराष्ट्रातील शासणाच्या जल योजनाची माहिति घेणे.
३. जलसिंचणाची स्थिती जानुन घेणे.
४. लोकसहभाग व सेवाभावी संस्थानी भूमिका जाणून घेणे.
५. पाणी पूरवठांच्या आव्हाणांना अभ्यास करणे.

पाणी ही प्रमुख व महत्वपूर्ण गरज असल्यामुळे भारत सरकाणे १९८७ राष्ट्रीय जल धोरण स्विकारले त्या काळानुरुप सातत्याने पाण्याचा वाढता वापर वाढत्या गरजा लक्षात घेऊन भारत सरकारने २०१२ साली राष्ट्रीय जलधोरण सर्वत्र प्रसारीत केले. राज्यातील विविध मुद्दे कायदे नियम यांचे पर्नगठण करण्यासाठी ही योजना धोरण आमलात आणले.

पाणी घरगुती वापरासाठी शेती व जलविद्यूत निर्मीती औष्णीक विजनिर्मीती राज्यातील प्रत्येक कुटुंबाला पाणी मिळणे हे गरजेचे आहे. पाणी एक व्यापाराई वस्तू मानायची की सर्वांना उपजीवीकेची सुरक्षितता मिळवून उेण्याचे साधन हा कळीचा मुद्दा आहे. अर्थशास्त्राच्या दृष्टीने यातून विचार केल्यास

Copyright ©authors

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

त्याची किंमत (इकॉनॉमिक व्हॅल्यू) आणि तूटवडा मुल्य (स्केअसिर्ही व्हॅल्यूम) या गोष्टीना जल मसूदयामध्ये स्थान दिल्याचे दिसते परंतू पाण्याचे असलेले अनन्यसाधारण महत्व लक्षात घेता पाण्याच्या आर्थिक व सामाजिक मुल्यांना विचार व्हायला पाहिजे. मानवी जिवन व पर्यावरण यांच्याशी आवश्यक असलेले पाणी पूरवून झाल्यावर इतर पाण्याचा वापर आर्थिक वस्तू किंवा व्यापारी वस्तू म्हणून केला जाऊ शकतो असे मसूदयात म्हटले आहे. तसेच सामाजिक न्याय पर्यावरणीय समतोल पाण्याचा आणि एकूणच सार्वजनिक संसाधनाला सुयोग्य वापर करणे गरजेचे आहे.

**महाराष्ट्र शासणाचा जलसंपदा विभाग :—**

महाराष्ट्रातील मोठे,मध्यम व लघू पाटबंधारे प्रकल्प च्या माध्यमातून मोठया प्रमाणात जलसिंचन केले जात आहे. त्यासाठी पाणीसाठा करणे व नियंत्रण ठेवणे गरजेचे आहे. राज्यात एकूण मोठे प्रकल्प १४१ आहेत. त्यातील मृत पाणीसाठा ६४७७.५९ ल.घ.मी.इतका मृत पाणीसाठा आहे. तर एकूण ३२२०६०९७ ल. घ. मी पाणी साठा उपलब्ध आहे. तर एकूण त्याची टक्केवारी आजच्या स्थितीत बघीतली तर ८८.११ टक्के इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. तर एकूण लघू प्रकल्प २८६८ आहेत. त्यात एकूण ४२.५१ ठक्के पाणीसाठा आज उपलब्ध आहे. जलसाठातील पाणी उपलब्ध व लागणारे पाणी याचे योग्य व्यवस्थापण करणे महत्वाचे आहे. हे धोरण राबवण्यासाठी जलसंपदा विभाग प्रमुख जलसंपदा मंत्री कॅबिनेट दर्जाचा मंत्री असतो व प्रशासकीय अधिकारी म्हणजे अभियंता आसतात. त्या पेमाणे धोरणांची अंमलबजावणी यंत्रण यांच्यावर पाण्याचे व्यवस्थापण आवलंबून असते.

**जलसिंचन**

“पावसाच्या पाण्याव्यतिरीक्त पिकांना दिलेल्या पूरक पाण्याला जलसिंचन असे म्हणतात.” तर भारतातील एकूण ४५० जिल्हयापैकी एकूण ४४ जिल्हयामध्ये बागायत ५० टक्के उत्पन्न होते तर इतर देशपेक्षा जलसिंनाखालील क्षेत्राच्या बाबतीत भारताचा जगात प्रथम क्रमांक लागतो. भारतात सरासरी एकूण ११९ से.मी. पाऊस पडतो. एकूण ४०० दशलक्ष घणमिटर पाणी मिळते. २१५ हे. मीटर जमिनीत मुरते तर पृष्ठभागावरुन वाहणाऱ्या पाण्यापैकी १५ द.ल.हे. पाणी धरणात अथवा तळयात साठवले जाते. धरणाच्या पाण्यापैकी वाफेद्वारे नष्ठ होणारे पाणी ५०.५ टक्के तळयातील ४० टक्के आहे. तर कालव्यातून होणारी पाण्याची गळ २० ते ३० टक्के आहे. भारतीय नद्यांच्या १८३९ क्यूबीक कि.मी. पाण्यापैकी ६९० क्यूबगीक पाणी उपलब्ध आहे.

**जलसिंचनाचे प्रकार :—**

**१. विहीर**

हे सिंचनाचा पारंपारीक मार्ग आहे. पूर्व काळापासून बारव, विहीर हे पाण्याचे स्त्रोत राहीले आहे. शेतकऱ्याला सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन देण्यासाठी शासणाकडून रोजगार हमी

Copyright ©authors

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

योजनेअंतर्गत अनुदान देण्यात येत आहे. कुशल आणि अकुशल असे ३ लक्ष इतके अनुदान देय आहे. 'जमिनीखालील पाणी काढण्यासाठी केलेल्या खड्डयावजा बांधकामाला विहीर असे म्हणतात.

**२. धरणे व कालव्याचे जाळे**

राज्यात याचे १५ टक्के पाण्याची गरज लक्षात घेता व सिंचनासाठी पाणी उपलब्ध करुन दयावयाची असेल तर अनेक धरणे व कालव्याचे जाळे उपसा सिंचन निर्माण करुन पाणी साठवून देवून शेतीसाठी विद्यूत निर्मीती उदयोगासाठी पाणी देता येते. तर कालव्याद्वारे पाणी वापर संस्थेच्या माध्यमातून पाणी देता येते.

**३. पाझर तलाव**

पाझर तलाव म्हणजे अगदी छोटे तलाव याचा मुख्य उद्येश भूजलसाठा वाढवणे. विहीरी,बोर चा पाणीसाठा वाढवणे. महाराष्ट्यात पाझर तलावाची योजना १९७२ साली अवर्ष्णग्रस्त परिस्थिती निर्माण झाली होती तेंव्हा ही योजना अमलात आणली होती. सध्या महाराष्ट्यात पाझर तलावांची संख्या १४०० आहे.

**४. उपसा सिंचन**

नदीच्या पात्रातील पाणी उंच भागावरुन पंपाच्या आधारे उपसा करुन कालव्याद्वारे शेतीसाठी पूरवठा करण्याच्या पध्दतीला उपसासिंचन असे म्हटले जाते. एमूण जलसिंचन क्षेत्रौकी ८ टक्के क्षेत्र उपसा सिंचनाचे आहे.

**५. ठिबक सिंचन**

सध्याच्या पाणी परिस्थीतीचा विचार करुन कमी पाण्यसावर जास्त उत्पादन घेण्याच्या दृष्टीने महत्वाचे आहे यासाठी पॉलीथीनच्या नळयाच्या आधारे तीटीद्वारे व ती पिकाच्या मुळापर्यंत पाणी दिल्यामुळे सिंचनचा हा उत्तम उपाय मानला जातो यासाठी सरकारकडून ८० ते ९० टक्के अनुदान दिले जात आहे.

**६. तुषार सिंचन**

तुषार सिंचन पध्दतीने पावसाप्रमाणे जमीनीवर पाणी पडते व त्यसाचे समान वितरण होते. या पध्दतीमुळे ३० ते ३५ टक्के पाणी बचत होते. उत्पन्नात १० ते १५ टक्के वाढ होते. सध्या हा र्प्याय ही महत्वपूर्ण आहे. यासाठी ही शासणाकडून ६० टक्के अनुदान दिले जाते.

महाराष्ट्यातील ८० ते ८५ टक्के शेती मोसमी पावसाच्या लहरी पणावर अवलंबून आहे. एकूण लागवडीखालील क्षेतापैकी १६.४ टक्के क्षेत्र हे सिंचनाखाली आहे. ठिबक सिंचनात महाराष्ट्र हे अग्रेसर राज्य आहे. भारताच्या ६० टक्के ठिबक महाराष्ट्यात केले जाते. २००६–२००७ मधील सिंचनाखालील एकूण क्षेत्र ३९.५८ लाख हेक्टर होत. कृष्णा,भिमा,गोदावरी,तापी,वर्धा,वैनगंगा या नदयांच्या खोऱ्यात लहान मोठया सिंचन प्रकल्प योजना कार्यान्वीत आहेत.

Copyright ©authors

**महाराष्ट्र राज्य सिंचन आयोग – १९६२**

महाराष्ट्रातील एकूण सिंचन क्षेत्र व जलसंपत्ती च्या विकासा संबंधी चौकशी करण्यासाठी स.गो.बर्वे यांच्या अध्यक्षेतेखाली ७ डिसेंबर १९६० रोजी या आयोगाची स्थपना झाली. १९६२ मध्ये आव्हाल शासणाकडे सूपूर्द करण्यात आला. त्यात त्यांनी सिंचनाचा विकास कालावधी ८ ते ५ वर्ष इतका असावा व प्रदेशात प्रवाही सिंचन पध्दती रावबणे अशक्य तेथे विहीरी सारखी सिंचन साधने योजावीत. तसेच १० ते १५ वर्षानंतर सिंचन धोरणाचे यपूर्वविमन करण्यासाठी खास चौकशी आयोग नेमावा.

**अवर्षणपवण क्षेत्रासाठी सत्यशोधक समीती (सुकथनकार) –१९७३**

१९७२ ते १९७४ मधील भिषण दुष्काळ पडल्यामुळे या समीतीची स्थापणा करण्यात आली यामध्ये पाठबंधारे,भूजल,पिण्याचे पाणी इ. प्रकरणाचा समावेश करण्यात आला.

**शिफारसी १**. राज्यातील ८३ तालुके अवर्षणप्रवण क्षेत्राात अंतर्भूत करावेत.

२. अवर्षण क्षेत्रात जलसंधारणाची कामे करावीत.

३. मृदाव जलसिंचनासाठी वनीकरणास प्राधान्य द्यावे.

४. पाणलोट विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबवावे.

**मागेल त्याला शेततळे योजना**

ही योजना फेब्रुवारी २०१६ ला सुरुवात करण्यात आली. यासाठी शासनामार्फत १० हजार कोटी रुपयाची तरतूद करण्यात आली होती. या योजने अंतर्गत मागेल त्याला शेततळे थेट अनुदान पध्दतीने राबवण्यात येत आहे. जलसिंचनाची उपलब्धता वाढवीणे तसेच संरक्षीत व शाश्वत सिंचनाची शाश्वत सिंचनाची सुविधा निर्माण करण्यात येत आहे.ज्या टंचाईग्रस्त गावात ५० टक्केपेक्षा कमी आणेवारी असेल अशा गावात ही योजना यराबवण्यात येते. $30 \times 30$ मीटर मोठा आकार तर छोटा आकार $15 \times 15$ मीटर त्यासाठी ५०,००० अनुदान देण्यात येत आहे. ही योजना कृषी विभागामार्फत राबवण्यात येत आहे. २०१६ ते २०१७ मध्ये २०७.५० कोटी मदत व पूर्नवसन विभागाकडून देण्यात आला आहे. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज करावा लागेल.

**पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम**

ही केंद्र व राज्य पूरस्कृत योजना राज्यातील बहुतांश शेती प्रजन्यमानावर आधारित आहे. यासाठी शेतीसाठी संरक्षीत जलसाधणे निर्माण कराणे,जमीनीची प्रचंड प्रमाणात होणारी धूप थांबवणे तसेच पडीम जमीनीचा विकास करुन ग्रामीण भागातील उत्पादनाची साधने वाढवणे हा उद्येश समोर

Copyright ©authors

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

ठेवून हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. राज्याचे भौगोलिक क्षेत्र ३० ते ५८ लक्ष हे इतके आहे. तर वहीतीखालील क्षेत्र १७४.०४ लक्ष हे. इतके आहे. सन १९८३ ते १९९२ पर्यंत एकात्मीक पाणलोट क्षेत्र विकास ही योजना केवळ कृषी विभागामार्फत राबविण्यात आली. या अंतर्गत भूर्गभाची पाणी पातळी वाढविणे समतल चर खोदणे. वाहून जाणारा गाळ अडवीणे इ. पाणी जमीनीत मूरविने ग्रामीण भागातील पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न सोडवणे. इ. कामे हाती घेण्यात आली व राबविण्यात आली.

एकात्मीक पाणलोट विकास व्यवस्थापन कार्यक्रम ( IWMP),पश्चिम घाट विकास कार्यक्रम ( WGDP ), राष्ट्रीय पाणलोट विकास कार्यक्रम ( NWDPRA ), नदीखोरे प्रकल्प ( RVP), विदर्भ सधन सिंचन विकास प्रकल्प VIIDP , महात्मा ज्योतीबा फूले जल – भुमी संधारण अभियान, साखळी पध्दतीने चेक डॅम बांधण्याचा कार्यक्रम तसेच वरील योजना हया केंद्र पूरस्कर असून राज्य परस्कृत योजनामध्ये नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधीद्वारे पाणलोट विकास कार्यक्रम, गतीमान पाणलोट विकास कार्यक्रम, आदर्श गाव योजना, टंचाईग्रस्त जिल्हयात साखळी पध्दतीने सिमेंट नालाबांध चेकडॅम योजना.

**क्षेत्र उपचार**

समतल चर, खोल सलग समतल चर, कंपार्टमेंट बिंडीग, पायऱ्यांची मलगी, जैविक समपातळी व ढाळीचे बांध, समतल मशागत जूनी भागात शेत बांध इत्यादी.

**नाला उपचार**

अवघड दगडाचे बांध, लहान माती नालाबांध, गॅबियन बंधारे, शेततळे, मातीनाला बांध, वळण बंधारे, सिमेंट नालाबांध इत्यादी.

वरीलप्रमाणे महारराष्ट्र शासणाकडून पाणलोटक्षेत्र विकास कार्यक्रम राबवयला जातो. या व्यतिरिक्त ही काही योजना राबवल्या जातात.

**जलयुक्त शिवार अभियान :–** जलयुक्त शिवार ही योजना नोव्हेंबर २०१४ ला सुरु करण्यात आली. महाराष्ट्रातील निसर्गाचे कालचक्र सातत्यात बदलल्यामुळे १४ मध्ये प्रचंड अवर्षन निर्माण झाल्याने मोठया प्रमाणात पाण्याची टंचाई भासू लागली याच्यावर मात करण्यासाठी व २०१९ ला टंचाई व टूंकर मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी ही योजना नोव्हेंबर २०१४ ला सुरु करण्यात आली. या योजनेत २०१४ ला प्रजन्यमान २० टक्क्यापेक्षा कमी झाल्याने असे एकूण १८८ तालूके व २२३४ गावांमध्ये टंचाईद्रव्य परीस्थिती जाहीर केली होती. म्हणूनच गेल्या चार वर्षात सरकारने लोकसहभाग, सेवाभावी, संस्थाच्या माध्यमातून २२ हजार ५९० गावांमध्ये जलसंधारणाची ५ लाख ७५ हजार कामे करण्यात आली.व त्यात एकूण ८ हजार ५४३ कोटी


Copyright©authors

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

रुपये खर्च झाला त्यातून २४.३५ लाख टी.एम.सी. इतका पाणीसाठी निर्माण झाला या योजने अंतर्गत एकूण १२ कामे हाती घेण्यात आली आहेत.अपार्टमेंट बिल्डींग,नालाबंधारे,खोलीकरण, व रुंदीकरण करणे, पाझर तलाव, गाव तलाव, साठवण तलाव गाळ काढणे, पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत बळकट करणे पाणी वापर संस्था बळकट करणे व लोकसहभाग वाढवणे. इत्यादी कामे करण्यात आली.

**जलयुक्त लातूर :–** लातूर जिल्हयात २०१६ मध्ये दुष्काळी परिस्थीती निर्माण झाली होती. लातूर शहराला मोठा टंचाईचा समना करावा लागला म्हणूनच सांगली मिरजहून लातूरला पाणी आणावे लागले होते. याचा विचार करत लातूर जिल्हयात लोकसहभागातून वेगवेगळया संस्था, यांच्या माध्यमातून श्रमदानातून ही मोठया प्रमाणात कामे हाती घेण्यात आली. विहीरी,शेततळे, नाला खोलीकरण, तलावातला गाळ काढणे. इत्यादी कामे हाती घेण्यात आली. तसेच २०१६–१७ मध्ये प्रचंड प्रतिसादही मिळाला.

**मांजरा नदीचे रुंदीकरण :–** लातूरला आलेल्या पाणी संकटामुळे खडबडून जागे झालेल्या प्रशासनाने लोकसभागातून मांजरा नदीचे १० ते १५ किमी पात्र रुंद खोल करुण साठवण क्षमता वाढवली जाते तसेच साई बॅरेज ते नागझरी बॅरे ५ मीमी खोलीकरण व रुंदीकरण चा प्रस्ताव मंजूर करण्यात आला.
सेवाभावी संस्थेचा ही सहभाग महत्वाचा आहे तयात पूरणमला लाहोटी शासकीय महाविद्यालय, लातूर या संस्थेच्या माध्यमातून कामाची तपासणी करण्यात आली.मांजरा नदीच्या प्रकल्पाची फलनिष्पत्ती पाहील्यास साई ते नागझरी असे एकूण २०४,७६६ घ.मी. गाळ काढण्यात आला. व हे गाळ शेतकऱ्यांना शेतात टाकण्यासाठी देण्यात आला यामुळे शेजारच्या एकूण २० गावामधील शेतकऱ्यांना जमीन सूपीक होण्यास फायदा झाला.एकूण शिवारातील ५०० हे. जमीन सिंचनाखाली आली नदी पात्रात सूमारे २०४ टी.एम.सी. एवढा जास्तीचा पाणीसाठा निर्माण झाला.म्हणूनच राज्यात मांजरा पॅटर्नमुळे , जलयुक्त शिवार अभियानाची चर्चा झाली होती.

**इतर योजना –**

१. महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पूणे
२. विदर्भ विकास महामंडळ, नागपूर – ३० मार्च १९९७/२००७
३. कोकण विकास महामंडळ ठाणे, – १९९७
४. तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगाव – १ जानेवारी १९९८
५. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास

वरिलप्रमाणे शासणाच्या विविध जलधोरणांचा व योजनांचा अभ्यास केलयानंतर यातून असे निषेध होते की, शासनाने केलेले प्रयत्न व प्रशासनाने केलेले प्रयत्न आजच्या परिस्थितीत कमी पडताना दिसत आहे.

**प्रशासन व जलधोरणातील दोष**

१. नैसर्गिक समतोल बिघडल्यामुळे पाणी प्रश्न गंभीर झाला आहे.

Copyright ©authors

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

२. विविध योजना राबवल्या जात असल्या तरी त्या योजनांची प्रभवी अंमलबजावणी होत असताना दिसत नाहीत.
३. विविध प्रकल्पावर तो निधी खर्च करण्यात आला तो व्यवस्थीत खर्च होत नाही.
४. सिंचन प्रकल्पाने योग्य नियोजन केले जात नाही.
५. शासणाकडून निधीची तरतूद केली असली तरीही तो निधी पूर्णपणे खर्च केला जात नाही.
६. पाण्याचा गैर वापर बऱ्याच प्रमाणात होताना दिसता.
७. जलसंपदा विभाग व त्या मंत्री व अधिकारी यांनी निकृष्ठ कामे केली व या लोकांनमध्ये भ्रष्टाचार झाल्याचे बोलले जाते.
८. मागेल त्याला शेततळे ही योजना राबवण्यासाठी अल्पभुधारक शेतकरी असल्यामुळे त्यांच्यासाठी शेत तळे घेणे शक्य नाही.
९. लोकसहभाग किंवा लोकांचे सहकार्य मिळत नाही.
१०.अनेक नदयांमध्ये ते पाणी आहे. ते घाण झाले असते.
११.ग्राम स्तरावरुन या योजनेची ग्रामपंचायत समीती केवळ नालाच असते. ती काम करताना दिसत नाही.
१२.गाव स्तरावर व्यापक प्रसिध्दी होताना दिसत नाही.
१३.वनीकरण विभाग हा केवळ नावालाच आहे प्रभावी वनीकरण होताना दिसत नाही.
१४.प्रशासन यंत्रणा प्रभावी अंमलबजावणी करण्यास कूचकामी ठरत आहेत.

**उपाय**

१. नागरी आणि ग्रामीण भागातील पाणी पूरवठयाच्या बाबतीतील विषमता दूर करण्याची गरज आहे.
२. पूर आणि दुष्काळ व्यवस्थापन करण्यात यावे.
३. पाण्याच्या कार्यक्षम उपयोग आणि संवर्धन यांचा विचार करुन दर ठरविण्यात यावेत.
४. राज्यातील पाणवठयांची दूरुस्ती करुन पूररुज्जीवन करुन त्याची क्षमता वाढवण्याचे प्रयत्न करावे.
५. भूगर्भातील पाणी खेचण्याचे आणि वाहतूक करण्याचे प्रमाण या विषयी दर एका वर्षाआड समालोचन करावे.
६. प्रशासकीय संघटन मजबूत व कार्यक्षम करणे गरजेचे आहे.
७. लोकसहभाग वाढवून लोकसहभागाच्या माध्यमातून जल स्त्रोत बळकट करावेत.
८. गावपातळीवर जाऊन कृषी सहाय्यक, कृषी अधिकारी यांनी शेततळी घेण्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहीत करावे.
९. औद्योगिक, व्यावसायिक आणि खाण व्यवसायासंबंधी खेचल्या जाणाऱ्या भूगर्भजलाचे मापन केले जाईल.
१०.राज्यातील तळी, तलाव, झरे, इत्यादी पाण्याच्या संसाधनासाठी सुधारण करण्यात यावी.
११.पाणी पूरवठा मार्गातील पाण्याची गळती कमी करुन महसूल न भरण्याच्या वर कार्यवाही करावी.
१२.टंचाईमुक्त व टँकर मुक्त महाराष्ट्र करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे.

Copyright ©authors

ISSN 2277-2359
Vol-12-Issue-03
March 2020

१३.जलयुक्त शिवार अभियानाची यश अपयशाची कारणे शोधावीत व अभियानाला बळकटी दयावी.

**संदर्भ :–**

१) थिटे चिंतामणी/ रसाळ प्रसाद – ग्रामीण विकासाची गुरुकिल्ली पाणलोट क्षेत्र विकास,२०१६ नारायणपेठ पूणे – १९९३
२) वैद्य वि.गो.– कृषीशास्त्र प्रवेश आणि जमीन पाणी व्यवस्था कॉन्हिनेन्टल प्रकाशन पूणे –३०
३) डॉ. शर्मा के.के. – भारत मे पंचायतीराज
४) डॉ. यमलवाड गोविंद – स्थानिक स्वराज्य संस्था
५) शासन निर्ण क्रमांक – जलअ २०१४
६) https latur.gov.in
७) www.mhas.gov.in
८) https//wcd.maharashtra.gov.in
९) www.sarkarnama.in
१०) राष्ट्रीय जल धोरणात बदलाची गरज – महाराष्ट्र टाईम्स २१ फेब्रुवारी २०१२
११) महाराष्ट्र राज्य जलनिती – जलसंपदा विभाग २०१९ ( शासन निर्ण क्रमांक – जलनीती –२०१९/प्र.कृ.
२१/जस/५ सप्टेंबर २०१९ )

१२)डॉ. राम जाधव – ग्रामीण विकास प्रशासन आणि मध्यम सिंचन प्रकल्प
१३)थोरात रामेश्वर माधव – लधू शोध प्रबंध बीड जिल्हयातील जलस्वराज्य प्रकल्पाचा अभ्यास २००८
कार्यक्रम अंदाजपत्रक महाराष्ट्र शासन – २०१४–१५ जलसंपदा विभाग
१४) डॉ. बी.एल. फाडीया – लोकप्रशासन साहित्यभवन प्रकाशनाला
१५) एम. लक्ष्मीकांत – लोकप्रशासन मॅग्रो हॉल प्रायव्हेट न्यु दिल्ली
१६) अवस्ती व माहेश्वरी – भारतीय प्रशासन, प्रकाशक लक्ष्मी नारायण अग्रवाल संजय टीक आग्रा

संशोधक
श्री तिरकंमटे निवृत्ती तुकाराम
मार्गदर्शक
रा.वाढवणा खुर्द ता. उदगीर
कत्तुरवार
जिल्हा लातूर Ph.d (लोकप्रशासन)
संशोधन केंद्र देगलूर महाविदयालय,
विभाग प्रमुख

संशोधन
डॉ.बी.आर.
(M.A.SET, Ph.D)
लोकप्रशासन

Copyright©authors

[illegible]
[illegible]
मो. [illegible]
[illegible]
email-tirkamte@gmail.com

समन्वयक, लोकप्रशासन
[illegible] महाविद्यालय,